बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०२ । अंक – ३५८ । वार शुक्रवार दि १९ सप्टेंबर एएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 02 Issue - 358 FRIDAY 19 September 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4


# शिक्षण विभागातील घोटाळेबाज आणि वादग्रस्त गटशिक्षण अधिकाऱ्याचा आणखी एक घाणेरडा कारनामा उघड?

**सदरील मुलगी गटशिक्षणाधिकाऱ्याच्या ताब्यात असताना सुरक्षित होती का? तिला कुठे आणि कशासाठी नेत होते? वाचा सविस्तर पुढील अंकात...**

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक :– दिपक थोरात मो.९८६०८९८५६४



त्या गटशिक्षणाधिकाऱ्याचा नाव पुढील अंकात उघडकीस येणार?

## केज शहरातून एका महिलेला हाताखाली धरून अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवले; नातेवाईकांनी पाठलाग करत मुलीची केली सुटका?

### न्यायासाठी नातेवाईकांची पोलीस अधीक्षकांकडे धाव; अप्पर पोलीस अधीक्षकांनी केज पोलीसांना कारवाई करण्याचे दिले आदेश!

**बीड (प्रतिनिधी):– बीड जिल्हा शिक्षण विभागात घोटाळ्यांनी, गैरव्यवहारांनी व भ्रष्टाचाराने कुप्रसिद्ध ठरलेले एक गटशिक्षणाधिकारी पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. काल सायंकाळच्या ६ ते ७ वाजण्याच्या सुमारास केज शहरून एका अल्पवयीन मुलीला फुस लावून नेत असल्याचे धक्कादायक प्रकरण उघड झाले आहे.**

**मिळालेल्या माहितीनुसार, एका महिलेला हाताखाली धरून त्या गटशिक्षणाधिकारी यांनी मुलीला गाडीत बसवून पळवून नेले. ही बाब नातेवाईकांना ताबडतोब कळताच त्यांनी गाडीचा पाठलाग केला. कासारी फाटा परिसरातील एका शेतात ती गाडी थांबवण्यात आली. मात्र, परिस्थिती हाताबाहेर गेल्याचे लक्षात येताच संबंधित गटशिक्षणाधिकारी पळून गेले, तर अल्पवयीन मुलगी आणि ती गाडी त्या ठिकाणी सोडून दिली. धक्कादायक बाब म्हणजे, त्या गाडीत यांचा मोबाईल नातेवाईकांच्या हाती लागला आहे, ज्यामुळे या प्रकरणाची विश्वसनीयता अधिक ठळक होते. सदरील गाडीच्या नंबर वरून एक बडा गटशिक्षणाधिकारी असल्याचे सिद्ध झाले आहेत.**

अल्पवयीन मुलगी संबंधिताच्या ताब्यात असताना सुरक्षित होती का? तिला कुठे आणि कशासाठी नेत होते? या प्रकरणामागे आणखी कोणाचा हात आहे? असे अनेक गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. या सर्व प्रश्नांची उत्तरे अजून गूढतेत आहेत. मुलगी व तिचे नातेवाईक थेट न्यायासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या दाराशी पोहोचले होते. परंतु ते कार्यालयात नसल्याने अप्पर पोलीस अधीक्षक सचिन



पांडकर यांनी त्यांची व्यथा ऐकून तातडीने केज पोलीसांना कारवाईचे आदेश दिले आहेत. आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष केज पोलीस प्रशासनाकडे लागले आहे. ते अल्पवयीन मुलीला न्याय देतील की राजकीय दबावाखाली हे प्रकरण दडपतील? अशी प्रचंड चर्चा सुरू झाली आहे.

गटशिक्षणाधिकारी हे यापूर्वीही अनेक घोटाळ्यांमुळे चर्चेत राहिले आहेत. शैक्षणिक विभागाचे नाव खराब करणाऱ्या अशा अधिकाऱ्यांना संरक्षण मिळते का? हीही एक मोठी शंका उपस्थित होत आहे. या घटनेनंतर बीड जिल्ह्यात संताप उसळला आहे. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या बेकायदेशीर कारवायांना आवर घालणार कोण? असा सवाल सामान्य नागरिक करत आहेत. निरपराध अल्पवयीन मुलीच्या जीवाशी खेळणाऱ्या अधिकाऱ्याला तात्काळ अटक व्हावी आणि कठोर कारवाई व्हावी अशी जिल्हावासीयांची मागणी आहे.

## अखेर NDRF जवान व सिरसाळा पोलिस याच्या प्रयत्नांना यश

– :परळी /प्रतिनिधी.:–

परळी तालुक्यातील परभणी जिल्ह्यात सीमारेषे नचिक असणारे मोजे कवडगाव घोडा येथील लिंगी नदीमध्ये दिनांक १६/०९/२०२५ रोजी आठ वाजण्याच्या सुमारास वाहून गेलेला तरुण शिवराज माणिकराव कदम वडील ३८ वर्ष राहणार ममदापूर तालुका परळी यांचा गत दोन दिवसापासून शोध कार्य करत असताना आज दिनांक १९ ९ २०२५ रोजी सकाळी



नऊ वाजण्याच्या सुमारास अथक प्रयत्नाने त्यांच्या मृतदेह आढळून आला.



घटनास्थळी तहसीलदार परळी व्यंकटेश मुंडे. सह पोलीस निरीक्षक सिरसाळा मंडळ अधिकारी व तलाठी शिरसाळा मंडळ छत्रपती संभाजी नगर येथून आलेले आपत्ती व्यवस्थापन टीम. परळी वैजनाथ नगर परिषद फायर ब्रिगेड व मताचे नातेवाईक. यांनी मोठ्या शर्तीचे प्रयत्न त्यांना शोधण्यासाठी केले. ममदापूर. कवडगाव. बोरखेड. व कवडगाव. घोडा येथील तरुण नागरिक. व भोई यांनी शोध कार्यात गेली दोन दिवस मोठी मदत केली.

**माजलगाव : मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्त गृहरक्षक दल कार्यालय परिसर व विश्राम गृह परिसरात जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व केंद्र नायक सुरेंद्र जव्हेरी आणि प्रशासकीय अधिकारी प्रकाश बताडे यांचे आदेशाने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले यावेळी तालुका समादेशक एम एम पांचाळ प्लांटून कमांडर बी जी कुलथे शेख बाहोधीन अविनाश उंबरे व गृहरक्षक दलाचे महिला व पुरुष जवान मोठ्या संख्येने उपस्थित होते तर या कार्यक्रमा वेळी आगामी नवरात्र उत्सव बाबत काही महत्त्वाच्या सुचना तालुका समादेशक पांचाळ यांनी दिल्या तर आगामी तुळजापूर नवरात्र बंदोबस्त कामी माजलगाव येथील काही जवानांना रविवारी पाठवायचे असल्याने त्यांना पण काही महत्त्वाच्या सुचना पलटण नायक कुलथे यांनी दिल्या तसेच साप्ताहिक कवायत बाबत योग्य ते मार्गदर्शन उंबरे यांनी केले असून आगामी बंदोबस्त लाठी हेल्मेट आदी बाबत योग्य ते मार्गदर्शन बाहूधीन यांनी केले**



## भ्रष्टाचारमुक्तीच्या लढ्यातील शिलेदार..इंजि. सादेक भाई इनामदार

बीड (प्रतिनिधी):– भ्रष्टाचार ही भारतीय व्यवस्थेता लागलेली कीड गद्दीपासून दिद्दीपर्यंत चोहीकडे ती घट्ट चिकटून बसलीय, आणि तिला संपुष्टात आणून देशातील खिलखिल्या होत चाललेल्या अर्थव्यवस्थेला चालना मिळावी, या उद्देशाने जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आण्णा हजारे भ्राचार निर्मुलन समितीचे राष्टीय अध्यक्ष. सादेक भाई इनामदार हे व्यक्तीमत्व लढा देत आहेत. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन शेकडो तरुण या लढ्यात उतरले. धारूरचे इंजिनिअर सादेक इनामदार हे एक प्रशाचार मुलीच्या लक्ष्यातील 'इमानदार' शिलेदार वयाच्या १८ वर्षी पोटासाठी लागणाऱ्या राशनमधील प्रचारापासून सुरू झालेली लढाई १५ वर्षे अविस्तपणे सुरु आहे. राशनमधील पोटाचा ते देशातील पहिला निवडणूक खर्च पोटाला उघडकीस आणणारे इंजि इमानदार हे भ्रष्ट अधिकाऱ्यांचा कर्दनकाळ ठरत आहेत.



दोन दिवसापूर्वीच जागतिक प्रशापार विरोधी दिन झाला, त्याच दिवशी बीड जिल्ह्यात पान लाचखेर पकडण्यात आले. त्या भ्रष्टाचारविरुद्ध इंजि. सादेक इनामदार यांचा तगादा लगेचच नजरेत येतो.

कायदेशीर मागनि भ्रष्टाचार उघडकीस आणला तर तो करण्याचे धाडस करणार नाहीत. त्यासाठी पदोपदी लढा द्यावा लागतो. याचे वैयक्तिक आयुष्यावर मुद्धा पडसाद उमटतात, हे ज्ञात असूनही समाजहितासाठी, देशहितासाठी सादेक यांनी लढा सुरु ठेवलाय आईन राशन दुकानावर रॉकेल आणण्यासाठी पाठविले, तेव्हा सादेक हे इथला दहावीत होते. राशन दुकानदाराने दोन ऐवजी एकाच महिन्याचे रकिल देऊन हाकलून लावले. आणि त्याचवेळी भ्रष्टाचार करणाऱ्यांना

पड़ा शिकविण्याचा निर्धार त्यांनी केला. त्याकाळात नाथाने अस्तित्वात आलेल्या माहिती अधिकाराचा वापर करून भ्रष्ट राशन दुकानदारास ताळ्यावर आणले होते. त्या प्रकरणातूर स्थांना प्रेरणा मिळाली. पुढे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांचा यांचा लढा डोळ्यासमोर ठेऊन सादेक हे प्रशचाराविरुद्ध लढू लागले. प्राथमिक शिक्षण धारूरमध्ये तर माध्यमिक शिक्षण शिक्षणानी पंदरी मानल्या जाणाऱ्या अंबाजोगाईतून पूर्ण केले. इंजिनिअरिंगचे शिक्षण बीड मधून घेतले.

या शिक्षणाबरोबरच त्यांनी शिबिरांसह कार्यक्रमात सहभाग नोंदविला भ्रष्टाचाराविरुद्ध लढाई त्यांनी स्वत पासून अन् स्वतःच्याच गावातून सुरु केली. प्रतिस्थितीमध्ये

पान २ वर...

## इतर कामात व्यस्त असल्यास मंत्रीपद सोडावे लागणार

### अजित पवारांचा राष्ट्रवादीच्या मंत्र्यांना सज्जड दम

पुणे : राष्ट्रवादीचे मंत्री इतर कामात व्यस्त राहणार असतील तर मंत्रीपद सोडावे लागेल, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्र्यांना दिला आहे. तसेच, पालकमंत्र्यांना तीन दिवस मतदारसंघांमध्ये काढावीच लागतील, अशी अट देखील त्यांनी घातली आहे.

नागपूर येथे राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून चिंतन शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराला राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री, खासदार, आमदारांसह वरिष्ठ नेते उपस्थित आहेत. या चिंतन शिबिरातून मार्गदर्शन करताना अजित पवार बोलत होते.

अजित पवार म्हणाले की आपल्या पक्षाच्या वतीने आयोजित राष्ट्रवादी चिंतन शिबिरात तुम्हा सर्वांचे मी सर्वप्रथम स्वागत करतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून आज माझे मन खूप भरून आले आहे. या सभागृहात आपले जवळपास पाचशे वरिष्ठ पदाधिकारी, नेते, सहकारी उपस्थित आहेत. मी आजूबाजूला पाहतो तेव्हा मला गर्दी दिसत नाही, मला माझे कुटुंब दिसते. तुमच्या प्रत्येकाच्या पाठीशी लाखो लोक उभे आहेत आणि तुम्हा सर्वांच्या उपस्थितीमुळे मला नव्या उमेदीने, नव्या आशेने पुढे जाण्याची ताकद मिळते.

हे शिबिर पुढच्या पिढीसाठी

आज आपण राष्ट्रवादी चिंतन शिबिरासाठी एकत्र आलो आहोत. हे चिंतन शिबिर केवळ पुढच्या निवडणुकीसाठी नाही, तर पुढच्या पिढीसाठी आहे. आज फक्त भाषणं करून वेळ घालवायचा नाही. आज प्रामाणिक चर्चा, धाडसी कल्पना आणि ठोस निर्णय घ्यायचे आहेत. आणि आज संध्याकाळपर्यंत आपण सर्व मिळून जो आराखडा ठरवू,



त्यालाच आपण नागपूर डिक्लेरेशन म्हणून अभिमानाने मांडणार आहोत, असे त्यांनी म्हटले.

पक्ष नेहमी लोकांच्या जवळ राहावा

अजित पवार पुढे म्हणाले की, मित्रांनो लक्षात ठेवा, संघटना केवळ वरच्या पातळीवरून मजबूत होत नाही, ती तळागाळातून बांधली जाते. म्हणून मी ठामपणे सांगतो, प्रत्येक नेत्याने आणि पदाधिका–याने काही ठराविक प्रकारचे संवादाचे टचपॉइंट लोकांबरोबर ठेवले पाहिजेत. बुथ–स्तरीय संवाद, प्रभाग सभा, जनसंवाद शिबिरे, राष्ट्रवादी परिवार मिलन, युवक टाउन हॉल, महिला बचतगट बैठक, आणि उद्योग/रोजगार सुविधा शिबिरे हे आपण वर्षभर शिस्तीने केले, तर आपला पक्ष नेहमी लोकांच्या जवळ राहील. कोणत्याही नागरिकाला असं वाटता कामा नये की राष्ट्रवादीचे नेते केवळ निवडणुकीच्या वेळीच दिसतात.

ठोस निर्णयाची गरज

तुम्हा सर्वांना ठाऊक आहे की आपण भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारमध्ये जूनियर सहयोगी आहोत. अनेक लोक मला विचारतात हे पाऊल का टाकलं? वैयक्तिक आणि कौटुंबिक नात्यांमध्ये वेदना का स्वीकारल्या? मी तुम्हाला मनापासून सांगतो ही सत्ता किंवा पदासाठी केलेली पावलं नव्हती. महाराष्ट्राला स्थिरता, प्रगती

पान २ वर...

## संपादकीय...

# ॲलोपॅथी आणि होमिओपॅथी डॉक्टरांचे भांडण काय आहे?

=====================

महाराष्ट्र सरकारने ५ सप्टेंबरला जाहीर केले आहे की, जे होमिओपॅथिक (इक्व्हड) डॉक्टर ॲलोपॅथिक औषधांच्या बाबतचा एक वर्षाचा कोर्स (सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी) पूर्ण करतील, त्यांना ॲलोपॅथिक औषधे वापरण्याची परवानगी मिळेल; त्यांची महाराष्ट्र मेडिकल काऊन्सिलमध्ये नोंदणी होईल. या काऊन्सिलने जाहीर केले की, 'वेगळ्या नोंदणी रजिस्टर' मध्ये ही नोंदणी होईल. या डॉक्टरांना फक्त या कोर्समध्ये शिकवलेल्या औषधांपुरती, कौन्सिलने बनवलेल्या प्रमाणित प्रणालीप्रमाणेच आधुनिक (ॲलोपॅथिक) औषधे वापरण्याची परवानगी असेल. या निर्णयाला विरोध दर्शवण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन व ॲलोपॅथिक डॉक्टरांच्या इतर संघटना १८ सप्टेंबरला संपावर गेल्या.

महाराष्ट्र सरकारने ३० जूनला हा निर्णय जाहीर केल्यावर त्याला आयएमएने विरोध केल्याने सरकारने ७ सदस्यांची एक विशेष समिती स्थापन केली. शिवाय आयएमएने मुंबई उच्च न्यायालयातून या प्रक्रियेला स्थगिती मिळवली. पण अचानक ५ सप्टेंबरला सरकारने हा निर्णय घेतला.

बहुसंख्य रुग्णांना ॲलोपॅथिक औषधे देणारा डॉक्टर हवा असतो. त्यामुळे बेकायदेशीर असले तरी बहुतांश होमिओपॅथिक डॉक्टर्स ॲलोपॅथिक औषधे देतात. 'आमच्या ॲलोपॅथिक प्रॅक्टिसला अधिकृत मान्यता मिळवण्यासाठी ॲलोपॅथिक औषधांचे ट्रेनिंग देणारा एक वर्षाचा कोर्स आम्ही करू; त्या आधारे आम्हाला ॲलोपॅथिक प्रॅक्टिस अधिकृतपणे करण्यासाठी परवानगी द्या', अशी त्यांची खूप दिवसांची मागणी आहे. त्यांचे म्हणणे, 'ॲलोपॅथिक कॉलेजेसप्रमाणे होमिओपॅथिक कॉलेजेसमध्येही डॉक्टरी शिक्षणात पहिल्या वर्षात ॲनाटॉमी, फिजिओलॉजी, पॅथॉलॉजी, इ. विषय असतात. फक्त ॲलोपॅथिक औषधशास्त्र शिकवत नाहीत एवढेच. ती

कमतरता दूर करण्यासाठी होमिओपॅथिक डॉक्टर्सना आता ॲलोपॅथिक औषधशास्त्र शिकवले की झाले!' पण वस्तुस्थिती अशी आहे की, पॅथॉलॉजी विषय शिकवूनही त्याचा फारसा उपयोग नसतो. कारण होमिओपॅथिक औषधोपचार करताना त्याचा काही उपयोग होत नाही. तो नंतर बराचसा विसरला जातो. त्यामुळे हा विषय होमिओपॅथी कॉलेजमध्ये पुरेशा गंभीरपणे शिकवलाही जात नाही.

होमिओपॅथिक असोसिएशन आणि सरकारचे म्हणणे की, 'एमबीबीएस डॉक्टर्स ग्रामीण भागात, दुर्गम भागात जात नाहीत. होमिओपॅथिक डॉक्टर्स जातात. तेथील जनतेला ॲलोपॅथिक औषधांचा लाभहोण्यासाठी ती वापरायची परवानगी या होमिओपॅथिक डॉक्टर्सना द्या.' ॲलोपॅथिक डॉक्टर्स म्हणतात, 'ॲलोपॅथीचे अर्धे कच्चे शिक्षण घेतलेल्या या डॉक्टर्सकडून रुग्णांचे नुकसान होईल म्हणून आमचा विरोध आहे.'

होमिओपॅथिक व ॲलोपॅथिक डॉक्टर्स या दोघांच्या संघटना आपापल्या भूमिका मांडताना त्या रुग्ण-हिताच्या आहेत, असे मांडतात. पण खरंतर त्यांचा हेतू आपापले व्यावसायिक हितसंबंध राखण्याचा असतो. औषध कंपन्या प्रचंड नफेखोरी करतात, मेडिको-इंडस्ट्रीवाले नवी वैद्यकीय तंत्रज्ञाने रुग्णांना गरज नसली तरी अनैतिक मार्गाने रुग्णांच्या गळ्यात मारतात; आरोग्य विमा कंपन्या रुग्णांची लुबाडणूक करतात; खासगी मेडिकल कॉलेजेस विद्यार्थ्यांना लुटतात. अशा प्रश्नांच्या बाबतीत अपवाद वगळता आयएमए रुग्णांच्या बाजूने उभी राहताना, संप करताना दिसत नाही.

'आशा' सेविकांना अर्धा डझन औषधे; प्राथमिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रांतील नर्सेसना डझनभर औषधे व 'कम्युनिटी हेल्थ प्रोव्हायडर' म्हणून सरकारी सेवेतील होमिओपॅथिक डॉक्टरला सुमारे ३० ॲलोपॅथिक औषधे वापरायला परवानगी असते. त्याचप्रमाणे होमिओपॅथिक डॉक्टर्सना योग्य प्रशिक्षण देऊन काही ॲलोपॅथिक औषधे वापरायला परवानगी द्यायला हरकत नाही. पण प्रशिक्षण दर्जेदार हवे, प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्याचे मूल्यमापन हवे आणि इतर ॲलोपॅथिक औषधे ते वापरत नाहीत ना, यावर देखरेखीची व्यवस्था हवी. ही तिसरी गोष्ट पाळली जाईल का, याची दाट शंका आहे. कारण आज परवानगी नसतानाही बहुतांश होमिओपॅथिक डॉक्टर्स सर्रास ॲलोपॅथिक औषधे वापरतात. वैद्यकीय क्षेत्रात सरकारी कृपेने चाललेल्या अराजकाचा तो भाग आहे. हे अराजक थांबले तरच रुग्णांना न्याय मिळेल. महाराष्ट्र सरकारने ३० जूनला हा निर्णय जाहीर केल्यावर त्याला आयएमएने विरोध केल्याने सरकारने ७ सदस्यांची एक विशेष समिती स्थापन केली. शिवाय आयएमएने मुंबई उच्च न्यायालयातून या प्रक्रियेला स्थगिती मिळवली. पण अचानक ५ सप्टेंबरला सरकारने हा निर्णय घेतला.

# जुने नायगाव शाळेतील शिक्षक संतोष वाघमोडे, सुजाता सोळसे यांना निरोप देतांना विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना अश्रू अनावर

पिंपळा (प्रतिनिधी):- श्रीरामपूर तालुक्यातील जुने नायगाव येथे निरोप समारंभ संपन्न झाला.कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या नोकरदार वर्गाला बदली हा प्रशासकिय नियम असतोच,मात्र काही जण आपला वेगळाच ठसा उमटवून जातात याचाच प्रत्यय नुकताच श्रीरामपूर तालुक्यातील जुने नायगांव शाळेतील मुख्याध्यापक संतोष वाघमोडे व श्रीमती सुजाता सोळसे यांना निरोप कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थी व ग्रामस्थांना आला.भाषणावेळी प्रत्येक बालक विद्यार्थी व ग्रामस्थ धाय मोकळून रडत होते.एखादी मुलगी सासरी नांदायला निघाल्यावर जी अवस्था होते तीच अवस्था नायगावकरांची झाल्याचा अनुभव आला.शाळेला आय.एस.ओ.(।ड०)मानांकनासह डिजीटल शाळा,मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा उपक्रमात तालुक्यात ३रा क्रमांक मिळवणारी शाळा ठरली.या शाळेच्या विकासात तन मन धनाने कार्य करणाऱ्या लाडक्या शिक्षकांना निरोप देताना सर्वांनाच गहिवरून आले.कारण या शिक्षकांनी विद्यार्थी हेच दैवत व स्वतःची मुले समजून काम केले.कार्यक्रमात दोन्ही शिक्षकांना नायगाव भूषण पुरस्काराने सन्मानित करून सुंदर मानपत्र प्रदान करण्यात आले.शाळेतील विद्यार्थी गेल्या सहा वर्षात अनेक स्पर्धेत चमकली तसेच या शिक्षकांमुळे शाळा व गावाचा नावलौकिक वाढला.स्थापनेपासून प्रथमच या शिक्षकांनी सलग तीन वर्ष वार्षिक



स्नेहसंमेलन आयोजित करून मिळालेल्या निधीतून शाळेचा भौतिक व सर्वांगीण विकास घडविला.संपूर्ण गावान याची जाणीव ठेवून निरोपाचा भव्य कार्यक्रम ठेवला.सलग चार तास सर्वांच्या डोळ्यात अश्रुंच्या धारा होत्या.विद्यार्थी व पालक मनोगत व्यक्त करताना ढसाढसा रडत होते..आणि हा कार्यक्रम एस न्यूज चॅनेल लाइव्ह असल्याने ज्यांनी ज्यांनी लाईव्ह पाहिला ते सुद्धा रडले..यावेळी शाळेत नव्याने रुजू झालेले शिक्षक शाकीर शेख व रेहाना मुजावर यांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ ग्रामस्थ संपतनाना लांडे हे होते.तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी संजीवन दिवे,केंद्रप्रमुख बाबासाहेब पिलगर,अशोक विटनोर,वाघुजी पटारे,सरपंच डॉ.राजाराम राशिनकर,उपसरपंच पुष्पाताई लांडे,माजी उपसरपंच मिनाताई चंद्रसेन लांडे,गोविंद दातीर,विठ्ठल बोरुडे,सुभाष बोर्डे,निमगाव खैरीचे सरपंच दत्तात्रय झुराळे,सुभाष लांडे,पोलिस पाटील राजेंद्र राशिनकर,देऊळगाव सिद्धी चे उपसरपंच रमेश कुंडकर,नामदेव वाघमोडे,कुलदीप सोळसे,सुनिल मार्तंड लांडे,सुनिल प्रकाश लांडे,किशोर आढाव,लहानु लबडे आदी मान्यवर उपस्थित होते.शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निलेश लांडे,उपाध्यक्ष अशोक वाघ,माजी अध्यक्ष जालिंदर राशिनकर,मनिषा राशिनकर,संतोष राशिनकर,किरणकुमार लांडे,किरण दातीर,रविंद्र दरेकर,दिपक राशिनकर, गोरख राशिनकर,डॉ.संदीप लांडे,शामसुंदर लांडे, सागर लहारे ,शिवाजी लहारे,महेश राशिनकर,रामप्रसाद दातीर,सुरेश राशिनकर,सुनिल दातीर,सतीश लांडे,ड.संदीप लांडे,दिगंबर लांडे,विक्रम भुसारी,सचिन भुसारी,सतीश जोशी,प्रदिप लांडे,यशवंत लांडे,प्रविण बोर्डे,अविनाश लांडे,सचिन लांडे,प्रताप लांडे, संजय राशिनकर,माजी उपाध्यक्षा पूजा लांडे,मिताली दातीर,इंदुबाई लांडे आदींनी परिश्रम व सुंदर नियोजन करून सर्व पालक व ग्रामस्थांच्या सहकार्याने भव्य दिव्य कार्यक्रम घडवून आणला.यावेळी विस्तार अधिकारी संजीवन दिवे यांनी दोन्ही शिक्षकांनी या शाळेत प्रेरणादायी,आदर्शवत व अविस्मरणीय काम करून संपूर्ण गावाला जिंकल अशा भावना व्यक्त केल्या.जिल्हा नियोजन अधिकारी दिपक दातीर यांनी ऑनलाईन माध्यमातून तसेच कार्यक्रमात किरण दातीर,किरणकुमार लांडे,सुभाष बोर्डे,संजय वाघमोडे यांनी दोन्ही शिक्षकांच्या बदलीनिमित्त मनोगतातून त्यांच्या कार्याचा गौरव करून हळहळ व्यक्त केली.विद्यार्थी वेदांत भुसारी,आरोही दातीर,रुद्र लहारे,कैवल्य दरेकर,आर्या व शौर्या लहारे,वेद नजन,प्रिती लांडे,माजी विद्यार्थी दिक्षा ढवळे,कृष्णा लांडे,लौकिक लांडे यांना मनोगत व्यक्त करताना अश्रू अनावर झाले.शिक्षक संतोष वाघमोडे व सुजाता सोळसे यांनी अत्यंत जड अंतःकरणाने शाळा व गाव सोडून जावे लागत असल्याच्या भावना व्यक्त करताना दोन्ही शिक्षकांनाही अश्रू अनावर झाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल ओहळ यांनी केले.यावेळी गावातील सर्व ज्येष्ठ नागरिक,माता भगिनी,तरुण मित्र मंडळ,माजी विद्यार्थी,नायगाव जुने मधील सर्व ग्रामस्थ घरे बंद करून कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेवटी किरण दातीर यांनी सर्वांचे आभार मानले.



विजय पालसिंगनकर कुलकर्णी यांच्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा शाल श्रीफळ देऊन सत्कार करताना भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील मिराताई गांधले जयश्री मुंडे संध्या राजपूत बालाजी पवार सौ कुलकर्णी ताई परजने पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते

पान १ वरून..

**इतर कामात व्यस्त असल्यास मंत्रीपद सोडावे लागणार**

आणि ठोस निर्णयाची गरज आहे, या माझ्या अंत:करणाच्या हाकेने मी हा मार्ग निवडला, असे देखील त्यांनी सांगितले. हाच माझ्या राजकारणात असण्याचा हेतू जेव्हा एखाद्या गावाला पाणी मिळते कारण मी एखादी फाईल पुढे ढकलली, तेव्हा मला समाधान मिळते. जेव्हा एखादा कारखाना सुरू होते कारण आपण जमीन किंवा परवानगीचा प्रश्न सोडवला, आणि हजारो तरुणांना रोजगार मिळतो, तेव्हा मला खरी आनंदाची जाणीव होते. प्रत्येक रात्री झोपायच्या आधी मी स्वत:ला एकच प्रश्न विचारतो आज मी किती लोकांचे जीवन सुधारले? हाच माझा यशाचा मापदंड आहे. हाच माझ्या राजकारणात असण्याचा हेतू आहे, असेही अजित पवार म्हणाले. महाराष्ट्राच्या विकासासाठीची सामायिक बांधिलकी महायुतीसोबतचा आपला सहयोग टिकून आहे. कारण परस्पर सन्मान आणि महाराष्ट्राच्या विकासासाठीची सामायिक बांधिलकी आहे. या समन्वयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मी आभार मानतो. आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचेही आभार मानतो. त्यांच्या नेतृत्वाने देशाला स्थैर्य मिळाले आहे आणि महाराष्ट्रासाठी त्यांनी नेहमी मोठं मन दाखवलं आहे. मी कधीही लोकहिताची मागणी मांडली, तर त्यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी नकार दिला नाही, असे म्हणत अजित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

---------------------

**भ्रष्टाचारमुक्तीच्या लढ्यातील शिलेदार..इंजि. सादेक भाई इनामदार**

त्यांनी स्वस्त धान्यातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी चौकशी करून कारवाईच्या मागणीसाठी सलग ५ दिवस अन्नत्याग केला. त्यांनी भ्रष्टाचार करणाऱ्या पाच दुकानदारांचे दुकान परवाने निलंबीत करण्यास तहसीलदारांना भाग पाडले. त्यांच्या लढाईतील पहिले यश होते. या लक्ष्यासोबतच त्यांनी सामाजिक कार्य सुरु केले. यात गोरगरीब, सर्वसामान्यांना राशन कार्ड मिळवून देत, प्रशासकीय समस्या सोडविणे अशी कामे निस्वार्थपणे केली. त्यातून त्यांचा जनसंपर्क वाढला ने काम बघून लीकाप्रतिनिधींना जमले नव्हते. सन २०१८-१९ मध्ये शासकीय हमीभावाने दर खरेदी केंद्र सुरू करण्याचे शासनाचे आदेश असतानाही खरेदी केंद्र सुरू नव्हते शेतकयांसाठी आंदोलने करून पणन महासंघाला केंद्र सुरु करून हमी देण्यास भाग पाडले. पांढऱ्या सोन्यासाठीया सुरु असलेला ला पुढे अनुदान, पीक विमा मिळवून देण्यासाठी सुरुच ठेवला. शासनाची फसवणूक करून मुद्रांक शुल्क बुडविणाऱ्यांना तो भरण्यास भाग पाडले. बोगसगिरी करणाऱ्या शेकडी अधिकारी, कर्मचाऱ्यांना घरचा रस्ता दाखविला, अनेकांना दंड ठोठावण्यास शासनाला भाग पाडते. हे सर्वकाही करत असताना अनेकांनी खंडणीचे आरोप केले, शासकीय कामात आडथाळा आणला म्हणून खोट्या गुन्ह्यात गोवण्याचा प्रयत्न केला. परंतू सत्य परेशान होता है, लेकिन पराजीत नहीं' या वाक्यावर विश्वास ठेऊन सादेक आजही लढत आहेत.

शासनाचे कोट्यवधी वाचवले, मिळाली पोलीस सुरक्षा

इंजि सादेक इनामदार यांनी १५ वर्षात शासनाचे कोट्यवधी रुपये भ्रष्ट अधिकारी , लोकप्रतिनिधींच्या घशात जाण्यापासून वाचवले त्यामुळे त्यांच्या विरोधात अनेक षडयंत्र रचण्यात आली.

त्यांच्यावर गाडीवर हल्ला झाला होता आला होतापरंतु त्यांचे कारण

समोर येऊ शकले नाही. तो प्रकार भ्रष्टाचार उघडतातून आल्याचा त्यांचा संशय आहे अनेकदा खंडासकीय कामात अडथळा आपल्याचा आरोप करताना अधिकांनीच यांना गोवण्याचा प्रयत्न केला पण सादेक यांनी अजुनही हार मानलेली नाहीं. दरम्यान, निवडणूक घोटाळा उघडनीस आणल्यानंतर शासनाने त्यांना आता विशेष पोलीस सुरक्षा पुरवली आहे.

देशातील पहिला निवडणूक खर्च घोटाळा उघडकीस आणला

सख्यातील सर्वात मोठं यश म्हणजे देशातील पहिला निवडणूक खर्च घोटाळा त्यांच्या पाठपुराव्यातून उघडीस आला. २०१८-१९ रुपयांचा खर्च तत्कालिन जिल्हा निवडणूक अवास्तव असून त्यांचे पुनरावेदे इंजि सादेक इनामदार यांनी मुख्य निवडणूक आयोगाकडे तक्रार केली. त्याची निवडणूक आयोगाने दखल घेऊन बौक्सी समिती नेमली त्यात सर्वात मोठी कारवाई झाली१६ कोटी पैकी ८ कोटी रुपये निवडणूक आयोगाने खर्च मान्य केला. त्यामुळे जनतेच्या पैशाची होणारी लूट थांबली.

यावरच हे प्रकरण थांबले नाही तर

निवडअधिकारी, दोषी ठरले आहेत त्यांचे दोषारोप शासनाने दाखल करण्यात आले असून असाच प्रकार मराठ्यातील अन्य जिल्हातही झाल्याचे समोर येऊ शकले निवडणुकीत किती खर्च झाला है आयोग विधानात नाही, हा गैरसमज. त्या निमित्ताने दूर झाला याच सर्व श्रेय सादेक इनामदार यांना जाते.

तर आपण महासत्तेच्या दिशेने जाऊ...

आपल्या नावासह परिसरात कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार

दिसून येत असल्यास सर्वसामान्य नागरिकांनी पुढे येऊन भ्रष्टाचार थांबवण्यासाठी प्रयत्न करणं गरजेचे आहे. तरच आपला देश आर्थिक महासत्तेच्या दिशेने प्रवास करू शकतो आणि आपला देश आर्थिक महासता बनण्यासाठी सर्व भारतीयांनी प्रायारमुक्त देश घडवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी खास करून तरूणांनी पुढे यावे.

-इंजि. सादेक इनामदार
राष्ट्रीय अध्यक्ष. भ्रष्टाचार निर्मुलन समिती

# डॉक्टर लोक मेलेल्या मड्याचे हि तुप खातात

वाचकांनो काही दिवसापूर्वी मी डॉक्टर लोकांवर लेख लिहिलं होते आणि त्यात क्रमशः असे लिहिले होते. त्याचाच पुढील भाग आज सादर करीत आहे.

काही तूरळक डॉक्टर लोक सोडले, ज्या डॉक्टर लोकांची प्रॅक्टिस प्रामाणिक असेल आणि ती सामाजिक भान ठेऊन असेल तर समस्त डॉक्टर लोकांना हे लिखाण चुकीचे वाटणार नाही.

काही डॉक्टर समाजाचा फक्त पैशांसाठी उपयोग करतात. सतत पैशाचा ओघ चालूच राहावा असं त्यांना वाटतं. मग सुरू होते याच्यातील

स्वतः शीच केलेली स्पर्धा आणि सुरु होते अमानवीय कृत्ये. हो असेच म्हणावे लागेल. कोण येत? किती येतात? त्यांच्याकडून किती पैसे घ्यायचे? त्यासाठी कोण कोणती आजार, रोग सांगू? असे होते या लोकांना. एकदा एका पेशंट ला कापला कि यांना असे वाटते कि आता कोणती प्रॉपर्टी घेता येईल? कुठे इन्व्हेस्टमेंट करू? का वेगवेगळ्या देशात फिरून येऊ? ७-८ वर्ष अभ्यास करून पदवी मिळाली कि यांना वाटतं आपल्याला एक पैसे कमविण्याची मशीन मिळाली. अशी मशीन कि कमी कालावधीत वारेमाप पैसे देणारी. लोकांचे कंबरडे मोडून स्वतःला श्रीमंत करणारी, पाहिजे तिथे प्रॉपर्टी आणि पाहिजे तिथे इन्व्हेस्टमेंट करणारी. या समस्त महाराष्ट्र मधील डॉक्टर लोकांची प्रॉपर्टी आणि ठिकठिकाणी जागा, जमिनी पाहिल्या तर एक अखंड भुप्रदेश तयार होईल. डिग्री मिळताच साठवलेलं हे सारं कमी कालावधीत मिळते कसे? याची खरंच कमाल वाटते. एखाद्या पेशंट ला कसे आणि किती कापायचे? हे डॉक्टर लोकांच्या तळ हातावरील खेळ. मग अश्या वेळी पेशंटच्या घरातील व्यक्तीला सांगितले जाते पेशंट सिरीयस आहे. आयसीयूमध्ये ठेवावे लागेल, ऑपरेशन करावे लागेल, शरीरात रॉड लागेल, अश्या अगणित कारणे देऊन स्वतः चा खिसा पॅक करायचा. एखादा पेशन्ट मेला असला तरी बिलासाठी डॉक्टर लोक आयसीयूमध्ये ॲडमिट करून घेतात. अशावेळी यांच्यातील माणुसकी संपलेली असते का? रोज असे कितीतरी मृत लोकांना जिवंत ठेवतात. विनाकारण ऑपरेशन,

विनाकारण मोठमोठाल्या शस्त्रक्रिया, अनेक विविध रोग, आजार सांगून हे लोक मड्या वरील तूप खाण्याचे काम करीत असतात. खरंतर जुन्या काळात डॉक्टर म्हणजे देवाचं दुसरं रूप मानले जात होते. पण आता हेच रूप रौद्र बनत आहे. समाजाचे आपण काही देणे लागतो. हा विचार हि यांच्या डोक्याला शिवत नाही. मोठं मोठ्या हॉस्पिटल ला तर रोजंच असे कित्येक पेशंटला फसवलं जात आहे.

डॉक्टर लोक पेशंटशी चुकीचे आणि गैरसोयीचे उपचार देतात. पेशंटच्या भावनांकडे दुर्लक्ष करतात. चुकीची माहिती देतात किंवा पेशंटला वेळेवर भेटत नाहीत. डॉक्टर च्या चुकांमुळे पेशंट ला मोठा मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रास होतो, ज्यामुळे त्यांचा डॉक्टरांवरील विश्वास कमी होतो आणि आरोग्यसेवेच्या गुणवत्तेवरही परिणाम होतो. (क्रमशः)



लेखन – रुपाली देशपांडे
संपर्क – ८८८८९५५५३९

पान ४ वरून..

**लिंबागणेश येथील गतिरोधक प्रकरणी ठिय्या आंदोलन**

प्रत्यक्ष काम सुरू न झाल्याने ग्रामपंचायत कार्यालयासमोर आज (दि.१९ सप्टेंबर) ठिय्या आंदोलन छेडण्यात आले.

आमदार संदिप क्षीरसागरांची आंदोलनस्थळी उपस्थिती दरम्यान, बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदिप क्षीरसागर हे अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची पाहणी करण्यासाठी तालुक्यात आले असता त्यांनी आंदोलनस्थळी भेट देत आंदोलनकर्त्यांची व्यथा ऐकली. त्यांनी तत्काळ जिल्हाधिकारी व कार्यकारी अभियंता यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत गतिरोधकाचे काम तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. ।मदारांच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. उपस्थित मान्यवर

या ठिकाणी महसूल मंडळ अधिकारी महादेव जायभाये, तलाठी गणपत पोतदार, ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर, सहाय्यक पोलीस फौजदार बाबासाहेब राख, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, ग्रामस्थ तसेच डॉ. गणेश ढवळे, पत्रकार हरिओम क्षीरसागर, भालचंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक हावळे व शिक्षकवृंद आदी मान्यवर उपस्थित होते.

-------------------

**कर्जमाफीसह, एकरी ५० हजार**

नुकसान भरपाई व शेतकऱ्याचे संपूर्ण कर्ज माफ करून मदतीचा हात देण्याचे व कर्तव्य बजवण्याचे काम शासनाने तत्काळ करण्याचे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी माजलगाव तालुक्यातील गंगामसला, आडोळा, सोमठाणा, छोटीवाडी, आदी गावांतील शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांच्या झालेल्या नुकसानीची बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करताना केले. १७ सप्टेंबर रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने माजलगाव तालुक्यातील पूरग्रस्त व अतिवृष्टीने बाधित झालेल्या, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना मानसिक आधार देऊन झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत विश्वास दिला व शासनाने शेतकऱ्याचे संपूर्ण कर्ज माफ करून एकरी सरसकट पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने करण्यात आली तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई न दिल्यास शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र लढा उभा करून शासनाला सळो की पळो करून सोडण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी दिला त्यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे शेतकरी आघाडीचे तालुकाध्यक्ष भाई अशोक बप्पा कुलकर्णी, तालुका सहचिटणीस भाई राहुल सोळंके, अभिषेक सोळंके, मनोज वगरे, चंद्रकांत खामकर, बाबासाहेब जाधव, आण्णासाहेब वगरे, शंकर सोळंके, सुदामराव जाधव, अशोक माने, विजयकुमार सोळंके, नारायण वगरे यांच्या सह शेतकरी बांधवांची उपस्थिती होती.

-------------------

**भोगलवाडी जिल्हा परिषद गटातून**

पूर्तता केली नाही, हा जिल्हा परिषद गट डोंगर पट्ट्यात आहे .जनतेचे अनेक प्रश्न रखडलेले आहेत.परंतु निवडणूक आली की राजकीय पक्षांची चढाओढ पहायला मिळते, जातीय समीकरणाच्या हिशोबाने उमेदवार देऊन निवडणूक लढवायची आणि पुन्हा जनतेच्या प्रश्नाकडे डोळेझाक करायची हा अनेक वर्षापासूनचा राजकीय पक्षांचा खेळ चालू आहे, त्यामुळे हा जिल्हा परिषद गट विकासाच्या दृष्टीने अतिशय मागासलेला दिसून येतो, परमेश्वर आडगळे हे सामाजिक कार्यकर्ते असून त्यांना जनतेच्या समस्येची जाण आहे त्यांनी सामाजिक प्रश्नावर काम केलेले आहे जनतेच्या प्रश्नासाठी शासन दरबारी आंदोलने मोर्चे काढून अनेक लोकांना न्याय मिळवून दिला आहे . जिल्हा परिषद गटामध्ये अनेक मूलभूत प्रश्न आहेत ते सोडवण्या साठी राजकारणातील पुढारी यांना जनतेचे काही घेणे देणे नसून स्वतःचे घर भरण्यापुरते जनतेसमोर जाऊन मतांची भीक मागतात परंतु परमेश्वर आडागळे हे सामाजिक कार्यकर्ते असल्याने जनतेचे प्रश्न गांभीर्याने सोडू शकतात त्यामुळे अशा सामाजिक कार्यकर्त्याला भोगलवाडी जिल्हा परिषद गटात जनतेची पसंती दिसून येत आहे,

# परभणी जिल्ह्याचे जबरी चोरी करणाऱ्या अटळ टोळीचा सिरसाळा पोलीसानी साहा जणांना घेतले ताब्यात

## चोरट्यांकडुन २५ मोटारी जप्त केल्या आहेत.



सिरसाळा (प्रतिनिधी):- सिरसाळा पोलीस स्टेशन हद्दीतील जिनिंग व देशी दारु दुकानात चोरी करणाऱ्या सोनपेठ (जिल्हा परभणी) च्या सहा जणांच्या मुस्क्या आवळल्या आहेत.

सिरसाळा.सोनपेठ रोडवरील शुभम कौटेक्स जिनिंग मधील मशिन व पाण्याच्या मोटरी व त्या ठिकाणी जवळील असलेल्या देशी दारू दुकानांत सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे डीव्हीआर मशीन व क्षळे फायबर व काही रोख रक्कम चोरून नेले होते. शुभम कॉन्टॅक्ट जिनिंग मध्ये २५ मोटारी ज्याची किंमत ७५ हाजार व देशी दारू दुकानातील १७००० हजाराचा असा चोरीत एकूण ९२००० हजाराचा हायवज लांबवला होता. ही घटना दिनांक १२ सप्टेंबर रोजी घडली होती. परंतु प्रकरण दिनांक १५ सप्टेंबर रोजी सिरसाळा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले होते. याप्रकरणी येथील व्यवस्थापक मोहन रतन राठोड. रा. तांडा तालुका सोनपेठ जिल्हा परभणी यांनी सिरसाळा पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली होती. या तक्रारीवरून गुन्हा दाखल होता.

सिरसाळा पोलीस प्रशासनने पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम. सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे. यांच्या मार्गदर्शनात सिरसाळा पोलीस ठाण्याचे सह पोलीस निरक्षक गोरखनाथ दहीफळे.पोलीस उपनिरीक्षक आनंद जाधव. व त्यांची टीम पोलीस शिपाई समुद्रे. भांगे. तौर. मेजर देशमुख. हावलादार वंजारे व पोलीस हवालदार सोनवणे.पोलीस शिपाई वडमारे देवकते पोलीस हवलदार शेंगोळे. सरकारी गाडीचे ड्रायव्हर पवार. तपासाची चक्री वेगात फिरवत फिर्याद दाखल झाल्यापासून चार दिवसातच चोरट्यांच्या मुस्क्या आवळल्या परभणी जिल्ह्यातील सोनपेठ येथील हे सर्व सहा आरोपी आहेत. काल दिनांक १८ रोजी सोनपेठ येथून सहा आरोपींना ताब्यात घेऊन त्यांना परळी न्यायालयात हजर केले. असता चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. आदिक तपास पोलीस उपनिरीक्षक आनंद जाधव करत आहेत.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यातील क्रांतीकारकांनी ध्येयनिष्ठेने निजामाच्या जुलमाच्या श्रृखंला तोडल्या- नामदेवराव वाघ





बीड दि. १७ (प्रतिनिधी): मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यातील क्रांतीकारकांनी ध्येयनिष्ठेने निजामाच्या जुलमाच्या श्रृखंला तोडल्या होत्या. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि मराठवाडा मुक्ती लढ्यात बलिदान देणा-या थोर देशभक्तांनी केलेले कार्य आणि त्यांनी दाखवलेला मार्ग प्रत्येक नागरिकांनी आपल्या जीवनात अंगिकारून उज्ज्वल जीवन जगावे असे आवाहन शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री नामदेवराव वाघ सर यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना केले. यावेळी ध्वजारोहण गावातील प्रतिष्ठित नागरिक तथा बीड शहरातील प्रसिद्ध उद्योजक श्री गणेश आबा कदम यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून झुंज सोशल वेल्फेअर फाँडेशनचे भाई आकाश निर्मळ, शिदोड गांवचे माजी उपसरपंच श्री पांडुरंग भाऊ शेंडगे शाळेचे मुख्याध्यापक श्री दत्तात्रय चव्हाण आणि श्री आत्माराम वाव्हळ सर आदी उपस्थित होते.

बीड शहरापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला

छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी, घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम लढल्याचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर गावातील प्रतिष्ठित नागरिक तथा प्रसिद्ध उद्योजक श्री गणेश आबा कदम यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणा नंतर आलेल्या मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या स्वागत समारंभा नंतर कु. श्रेया कदम कु. अक्षरा साळुंके, कु. अक्षरा मस्के कु. प्रीती कांबळे यांनी देशभक्ती गीत सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिना विषयी कु. श्रेया कदम हिने विचार मांडले. तसेच शेकापचे भाई आकाश निर्मळ यांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामातील मोलाचे योगदान देणाऱ्या क्रांतीकारी लोकांच्या संघर्षाला उजाळा दिला. तर श्री गणेश आबा कदम यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाची सविस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना संस्थेचे सचिव श्री नामदेवराव वाघ सर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने सविस्तर मार्गदर्शन केले केले.

# डायलिसीस सुविधेचा लाभ गरजु रुग्णांनी घ्यावा-आ. विजयसिंह पंडित

## गेवराई उपजिल्हा रुग्णालयात आठ डायलिसिस मशिन कार्यान्वीत




गेवराई, दि. १८ (प्रतिनिधी) :- किडणी विकार असलेल्या रुग्णांसाठी डायलिसिस सुविधा अतिशय महत्वाची आहे. डायलिसिस साठी लागणारा हजारो रुपयांचा खर्च आता वाचणार असुन महायुती सरकारने तालुकास्तरावर आशा वैद्यकीय सुविधा मोफत उपलब्ध करुन दिल्या आहेत. गेवराई उपजिल्हा रुग्णालयात आठ डायलिसिस मशिन आजपासुन कार्यरत होत असुन महाडायलिसिस सेंटर कार्यान्वीत होत असल्यामुळे गोर-गरीब किडणी रुग्णांना त्याचा लाभ होणार आहे. त्यामुळे डायलिसिस सुविधेचा लाभ गरजु रुग्णांनी घेण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. गेवराई उपजिल्हा रुग्णालयातील महाडायलिसिस सेंटर उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, अधिक्षक डॉ. सुरज कोठावळे, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, माजी नगरसेवक शांतीलाल पिसाळ, राधेशाम येवले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे यांच्यासह मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य विभाग, एचएलएल लाईफ केअर लि. व उपजिल्हा रुग्णालय, गेवराई यांच्या माध्यमातुन किडणी विकार रुग्णांच्या मोफत डायलिसिस उपचारासाठी आठ डायलिसिस मशिनसह महाडायलिसिस सेंटर उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे सुरु करण्यात आले आहे. गुरुवार दि. १८ सप्टेंबर रोजी गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते महाडायलिसिस सेंटर चा शुभारंभ करण्यात आला. यावेळी व्यासपिठावर यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, अधिक्षक डॉ. सुरज कोठावळे, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, विनोद सौंदरमल, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, माजी नगरसेवक शांतीलाल पिसाळ, राधेशाम येवले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अशोक काळे, बंटी सौंदरमल, दत्ता दाभाडे, जे.के. बाबुभाई, संदिप मडके, जिजा पंडित, विलास निकम, अॅड. मनोज हजारे, शेख सुभान, संतोष सुतार, सतिष प्रधान यांच्यासह गेवराई शहरातील पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

किडणी विकाराच्या रुग्णांना डायलिसिस उपचार अतिशय महत्वाचे आणि जीवन संजिवणी ठरणारे आहेत.

### शिवैक्य वेदमूर्ती नागनाथ महाराज स्वामींचे पाचवे पुण्यस्मरण

# हाडोंग्री येथे कीर्तन सोहळा व महाप्रसादाचे आयोजन



बीड (प्रतिनिधी): श्री. क्षेत्र कपिलधार मन्मथ स्वामी संस्थान मुख्य पूजा पुरोहित शिवैक्य वेदमूर्ती श्री नागनाथ महाराज स्वामी यांचे पाचवे पुण्यस्मरण भाद्रपद कृष्ण त्रयोदशी, शके १९४७, शुक्रवार दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी साजरे करण्यात येणार आहे.

या निमित्ताने श्री क्षेत्र शिवकडा मन्मथस्वामी तपोभूमी, हाडोंग्री येथे एकदिवसीय कीर्तन सोहळा व गुरुमाऊलींचे आशिर्वचन होणार असून भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचीही व्यवस्था केली आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री हाडोंग्री भजनी मंडळाच्या वतीने होणाऱ्या संगीत भजनाच्या शिवजागराने होणार आहे. त्यानंतर दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता श्री शि.भ.प. माहेश्वरमुर्ती विश्वनाथ स्वामी(वडवळकर जि.लातूर)

यांचे कीर्तन होईल. यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पुण्यस्मरण सोहळ्यास श्री.ष.ब्र.१०८ गुरुविरुपाक्ष शिवाचार्य महाराज(जहागीरदार मठ संस्थान मानूर मठाधिपती ) व श्री.ष.ब्र डॉ. १०८ राचलिंग शिवाचार्य महाराज (परंडकर बार्शी मठ संस्थान मठाधिपती) हे शिवाचार्य उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात अधिकाधिक भाविकांनी सहभागी होऊन पुण्यस्मरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी परिवारातर्फे करण्यात आले आहे.



बीड : बीड जिल्हा कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत साहेबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना फहीम इनामदार, पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्र राज्य चे अध्यक्ष रविंद्र शिनगारे.

# नंदपूर जि.प.प्रा.शाळा नालसाहेब वस्ती येथील शिक्षकाची बदली गावकऱ्यांच्या जिव्हारी लागली १० वर्षात अनेक विद्यार्थी घडवले



गेवराई (प्रतिनिधी):- आज दिनांक १८/ ०९/२०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नालसाहेब वस्ती नंदपुर येथे निरोप समारंभ कार्यक्रम निमित्त शाळेचे मुख्याध्यापक श्री एकनाथ भालेकर सर तसेच माझ्या मुलाचे गुरु तथा मार्गदर्शक सहशिक्षक शरद गायकवाड सर यांची बदली झाली या निमित्ताने नंदपूर येथे गावकऱ्यांच्या वतीने निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यानिमित्ताने निरोप समारंभाच्या भाषणात श्री शरद गायकवाड सर यांनी दहा वर्षाचा नंदपुर येथील अनुभव सांगितला व नंदपूर येथील सरांचे विद्यार्थी मनोगत एकत होते मनोगत चालू असताना विद्यार्थ्यांच्या अचानक डोळ्यात अश्रू चा बांधा फुटला व गावातील महिला व पुरुष मंडळी सर्वांनी एकाकीच हंबरडा फोडाला काही विद्यार्थी सर तुम्हीच आम्हाला या शाळेवर शिकवण्यासाठी राहा असे अनेक विद्यार्थ्यांचे आग्रह होता यावेळी गावातील नागरिकांच्या डोळ्यात अक्षरशा अश्रूच्या धारा उतरल्या होत्या सरांना देखील ते पाहून सर देखील गहिवरून गेले व सरांच्या देखील डोळ्यातुन अश्रू वाहू लागले असे शिक्षक आमच्या नंदपूर नालसाहेब साहेब वस्ती येथे मिळणे खूप कठीण आहे सर आपण जिथे जाल तिथे नंदपुर येथील नागरिकांचे प्रेम कधीच विसरू नका हे गावकऱ्यांच्या वतीने विनंती आहे यावेळी गावातील कर्तव्यदक्ष उपसरपंच शेख फत्तु मामु काशिनाथ आडागळे मा.ग्रा.पं.सदस्य विष्णू भाऊ उबाळे ग्रा.पं.सदस्य चंदू आडागळे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष चंद्रसेन उबाळे माणिक उबाळे शेषेराव आडागळे बंडू आडागळे ज्ञानोबा आडागळे शहजाद शेख पांडुरंग उबाळे ट्रेनी सहशिक्षक डिगाबंर उबाळे दत्तू उबाळे अशोक उबाळे मन्सूर शेख आकाश आडागळे ओमकार आडागळे बाबा माळी पांडुरंग माळी तुकाराम आडागळे विशाल आडागळे विकास आडागळे शेख आफरोज सिकंदर शेख गणेश अडागळे यशराज आडागळे करण माळी सुनील उबाळे दासू उबाळे रामभाऊ सोळंके गावातील नागरिकांनी निरोप समारंभाच्या निमित्ताने नंदपुर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथून भव्य दिव्य मिरवणूक काढून सरांना शुभेच्छा दिल्या पुढील शाळेवर असेच कर्तव्यदक्ष काम करून नंदपूर सारख नाव उज्वल करा हीच आम्हा गावकऱ्यांची अपेक्षा इथेच थांबतो जय हिंद जय महाराष्ट्र जय भारत

# हजरत ख्वाजा मख्दुम महेमुदशाह अन्सारी (रहे) ऊर्स निमित्त फळ व पाणी वाटप



माजलगाव (प्रतिनिधी):- तालुक्यातील पात्रुड येथील हजरत ख्वाजा मखदूम महेमुदशाह अन्सारी ( रहे) उर्स हा प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहास प्रारंभ झाला असून येथील संदल, उर्स मध्ये अनेक जाती धर्मातील व पंचक्रोशीतील तसेच दूर दूर होऊन भाविक येत असतात.

या भाविक भक्तांच्या प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी सोमनाथ चांदमारे युवा मंच पात्रुड चे सर्वेसर्वा, तसेच पुणे येथील युवा उद्योजक सोमनाथ चांदमारे यांच्यावतीने या यात्रेस येणाऱ्या भाविकांना अल्पोपहाराच्या माध्यमातून केळी, मोसंबी फळे तसेच पाण्याचे वाटप करण्यात आले. दरवर्षी सोमनाथ युवा मंच पात्रुड, येथील पुणे येथे युवा उद्योजक म्हणून ख्याती असणारे सोमनाथ चांदमारे हे हजरत ख्वाजा मख्दुम मेहमूदशाह अन्सारी ( रहे ) यांच्या उरसा निमित्त भाविक भक्तांच्या भोजनासाठी व अल्पोपहाराची सोय राबवत स्तुत्य उपक्रम राबवत असतात. या त्यांच्या निस्वार्थी अन्नदान कार्यक्रमाच्या उपक्रमामुळे पंचक्रोशीतील व बाहेरून येणाऱ्या भाविकांच्या चेहऱ्यावर आनंद पहावयास मिळाला. या उपक्रमामुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

# नैसर्गिक आपत्तीमध्ये बचाव कार्यात सहभागी असणारे सामाजिक कार्यकर्ते व नागरिक यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सन्मान



सिरसाळा (प्रतिनिधी):- मौ कौडगाव हुडा ता परळी वै येथील दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी मध्यरात्री १२ ते १२.३० च्या दरम्यान एक चारचाकी गाडी ओढ्याच्या पुरात वाहून गेली.चार जणापैकी तिघांना सुखरुप बाहेर काढण्यात यश आले.मा मंत्री आ धनंजय मुंडे साहेब यांना सदरची घटना कळताच संपर्क कार्यालयातून सुत्र हालवून स्थानिक महसूल प्रशासन,पोलीस प्रशासन जगमित्र कार्याला संपर्क टीम व गावक-यांच्या मदतीने तीन जणांचे प्राण वाचवण्यात यश आले.या वेळी प्रशासन सोबत राजाभाऊ पौळ, सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाबुराव रूपनर, सुभाष नाटकर व इतर स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते. या बचावकार्यात मदत करणारे नागरिक व सामाजिक कार्यकर्ते यांचा आज बीड येथे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.अजित (दादा) पवार साहेब यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी माजी मंत्री तथा परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा.धनंजयजी मुंडे साहेब उपस्थित होते.





बीड : आज जुना बाजार बीड येथे कामगार सेना कार्यालय व हिंद मल्टी सर्विस सेंटरचे कार्यालयाचे चे उद्घाटन थाटात संपन्न झाले त्याप्रसंगी प्रसंगी हिंद मल्टी सर्विस चे मालक नवीद खान उर्फ(बाबा खान) यांनी समाजसेवक मुसाखान पठाण यांच्या शाल हार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला त्याप्रसंगी सोबत जैद कादरी दिसत आहेत...

# शासनाच्या कामगार विरोधी निर्णयाकडे कामगार संघटनांचे दुर्लक्ष का?

## निदान बीड जिल्ह्यातील कामगार संघटनांनी तरी विरोधात पुढे यावे - एस.एम.युसूफ

बीड (प्रतिनिधी) - शासनाने नुकतेच कामगार विरोधी धोरण अवलंबून दररोज बारा तासांची एक पाळी प्रमाणे कामगारांना काम करावे लागेल असा निर्णय घेतला. याचा दूरचित्रवाहिन्यांमधून बराच प्रचार व प्रसार झाला परंतु कामगार संघटना मात्र याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे निदान शासनाने घेतलेल्या या निर्णयाच्या विरोधात बीड जिल्ह्यातील कामगार संघटनांनी तरी पुढे यावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, कंपन्या असो की कारखाने तिथे कामगारांना एक टार्गेट दिले जाते. त्या टार्गेट नुसार कामगारांना राबराब राबून टार्गेट पूर्ण करावे लागते. आठ तासाच्या एका पाळीत काम करून कामगार पार थकून जातात. तरीसुद्धा अनेक कंपन्या खाजगी कंत्राटदार आणि दलालांना हाताशी धरून त्यांच्यामार्फत भरती केलेल्या हंगामी कामगारांना कुठल्याही सोयीसुविधा न देता, कामगारांच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली करून अगोदरच बारा तास काम



करून घेत होते. आता तर दस्तूरखुद्द शासनाने बारा तासांची पाळी प्रमाणे कामगारांना काम करावे लागेल असा निर्णय घेतल्याने अशा कंपन्या कामगारांकडून वेठबिगारासारखे कमी दामात भरपूर काम करून घेतील. ज्यामुळे अगोदरच बेरोजगारीने त्रस्त झालेले सुशिक्षित वेठीस धरले जातील. दररोज बारा तास काम करून कामगार जवळपास अर्ध मेले होऊन कंपन्यांबाहेर पडतील. कुटुंबीयांच्या सुख-दुःखात ते उपस्थित राहू शकणार नाहीत. दररोज टार्गेट प्रमाणे मेहनत करून बारा तास काम करणे शासनाने घेतलेल्या झटपट निर्णयासारखे सोपे नाही. याचा अनुभव शासनकर्त्यांना घ्यायचा असेल तर त्यांनी स्वतः कामगार म्हणून कंपन्यांमध्ये कमीत कमी महिनाभर तरी काम करावे म्हणजे कळेल कामगारांना कसे काम करावे लागते ते. या बाबी शासन-प्रशासनाला एक वेळ कळत नसेल असे जरी गृहीत धरले तरी जेवढे राजकीय पक्ष आहेत, त्यापैकी बऱ्याच राजकीय पक्षांच्या कामगार संघटना देखील आहेत. शिवाय राजकीय पक्ष विरहित सुद्धा अनेक कामगार संघटना आहेत परंतु शासनाने घेतलेल्या बारा तासांच्या पाळीचा निर्णय जो कामगारांसाठी यातना देणारा आहे, त्या निर्णयाविरोधात आतापर्यंत एकही कामगार संघटना पुढे आल्याचे दिसले नाही.

### टी सी हरवला आहे.

ओंकार दादासाहेब खाकरे रा.वाकनाथपुर ता.जि.बीड या नावाचा दहावी पास चा टी सी बीड ते वाकनाथपुर प्रवासादरम्यान हरवला आहे तरी कोणाला सापडल्यास ९३५९२२५९८६ या नंबरवर संपर्क साधावा

# सायं.दै महाराष्ट्र आरंभ 'वर शुभेच्छांचा वर्षाव...



## कर्जमाफीसह, एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्या-नारायण गोले

माजलगाव प्रतिनिधी तालुक्यातील गोदाकाठच्या गावात, शेतकऱ्यांच्या घरात पाणी शिरले असतानाच गंगामसला, किट्टीआडगाव सर्कल सह माजलगाव तालुक्यातील सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झालेले आहे या शिवाय शेतकऱ्यांच्या शेतातील सर्वच पिके सडून गेली आहेत, त्यामुळे संकटात सापडलेल्या आणि सर्वस्व हरवलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला एकरी ५० हजार रुपये पान २ वर...






## लिंबागणेश येथील गतिरोधक प्रकरणी ठिय्या आंदोलन

### आ. संदिप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधत काम मार्गी लावण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित – डॉ. गणेश ढवळे



लिंबागणेश (प्रतिनिधी):-बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील अहमदपूर - अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी वर भालचंद्र माध्यमिक विद्यालय व बसस्थानक परिसर हा अपघातप्रवण भाग असल्याने येथे गतिरोधक बसविण्याची मागणी डॉ. गणेश ढवळे व पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी वारंवार निवेदनांद्वारे व आंदोलनांद्वारे केली होती.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी बीड श्री. विवेक जॉन्सन यांच्या आदेशानुसार दि.२६ जून रोजी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, रस्ता सुरक्षा समितीचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे, तसेच वाहतूक शाखेचे प्रमुख सुभाष सानप यांनी घटनास्थळी पाहणी केली होती. यावेळी सूचनाफलक लावण्याच्या सूचना कंत्राटदार व महामार्ग अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या. मात्र पाहणीस तीन महिने उलटूनही पान २ वर...

## भोगलवाडी जिल्हा परिषद गटातून मानवी हक्क अभियान च्या वतीने परमेश्वर अडागळे निवडणूक लढावणार

धारूर (प्रतिनिधी) धारूर तालुक्यातील भोगलवाडी जिल्हा परिषद गटातून परमेश्वर आडगळे हे निवडणूक लढवणार असून त्यांनी अनेक दिवसापासून तयारी सुरू केली आहे.



भोगलवाडी जिल्हा परिषद गट हा अतिशय प्रतिष्ठेचा मानला जातो , या गटामधून अनेक राजकीय पुढाऱ्यांनी निवडणूक लढवली परंतु या गटाचा अजूनही म्हणावा तसा विकास झालेला नाही. निवडणुकीमध्ये अनेक राजकीय पुढाऱ्यांनी मोठ्या मोठ्या घोषणा केल्या ,आश्वासने दिले ,परंतु त्या आश्वासनाची पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT